अमृतमहोत्सवी
स्थापना १९३९
पुढारी
प्रचंड खपाचे एकमेव निःपक्ष व निर्भीड दैनिक
www.pudhari.com
पुणे
मंगळवार । २६ जून २०१८ । स्थापना वर्ष ८० वे । आवृत्ती वर्ष ११ । मुंबई, पुणे, औरंगाबाद, कोल्हापूर, सांगली, सातारा, ठाणे, रायगड, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, अहमदनगर, नाशिक, सोलापूर, बेळगाव, गोवा येथून एकाचवेळी प्रसिद्ध



सिटी इंटर नॅशनल स्कूलमध्ये पालकांची चौकशी करूनच विद्यार्थ्यांना सोडताना सुरक्षारक्षक.

# विद्यार्थ्यांची जबाबदारी शाळा प्रशासनावर

## सिटी इंटरनॅशनल स्कूलच्या मुख्याध्यापिकांची ग्वाही

**वानवडी :** विद्यार्थ्यांच्या सुरक्षेची जबाबदारी शाळा प्रशासनावर असते. ती जबाबदारी आम्ही चोखपणे पार पाडत असून, आमच्या शाळेत सीसीटीव्हींबरोबरच बसमध्येही जीपीएस यंत्रणा बसविण्यात आली आहे. पालकांच्या विश्वासाला तडा जावू देणार नाही. असा विश्वास सिटी इंटर नॅशनल स्कूलच्या मुख्याध्यापिका अर्चना क्षिरसागर यांनी व्यक्त केला. वानवडी येथील सिटी इंटर नॅशनल स्कूलमध्ये जवळपास १ हजार ६०० विद्यार्थी शिक्षण घेत आहेत.

सुरेश मोरे

विद्यार्थ्यांना ये-जा करण्यासाठी लहान मोठ्या २० बसेस कंत्राटी पध्दतीने ठेवण्यात आल्या आहेत. प्रत्येक बसची आरटीओकडून तपासणी झाली असल्याचे प्रमाणपत्र पाहायला मिळत नाही तोपर्यंत ती बस शाळेच्या सेवेत घेतली जात नाही. प्रत्येक बसमध्ये मदतनीस ठेवण्यात आली आहे. बसवर असणाऱ्या चालक, मदतनीसची सर्व माहिती शाळा प्रशासन, पोलिस व पालकांना दिली जाते. काही पालक आपल्या पाल्याला शाळेपर्यंत आणून सोडतात. जे विद्यार्थी आमच्या स्कूलबसमधून प्रवास करतात ते आपल्या घरी पोहचेपर्यंत शाळा प्रशासन दखल घेते. पालक, शिक्षक, स्कूल बस वाहतूक व्यवसायिकांची बैठक घेवून अडीअडचणींचा आढावा घेतला जातो. प्रत्येक वर्गात व आवारात सीसीटीव्ही लावण्यात आले आहेत. शिवाय महिला व पुरूष सुरक्षारक्षकांची नेमणूक करण्यात आली असल्याचे मुख्याध्यापिका क्षिरसागर यांनी सांगितले.

मात्र, वानवडी, कोंढवा परिसरतील अनेक इंग्रजी माध्यमाच्या शाळांकडे खासगी बसेस, व्हॅन, रिक्षा पाहायला मिळतात. त्यामध्ये विद्यार्थ्यांना अगदी कोंबून बसविले जाते. अशा स्कूलबसवर किंवा व्हॅन, रिक्षांकडे शाळा प्रशासनाचे दुर्लक्ष होत आहे. शिवाय, आरटीओ वाहतूक पोलिस कोणतीही कारवाई करताना दिसत नाहीत. काही इंग्रजी माध्यमाच्या शाळांचे अपवाद वगळत अनेक शाळा विद्यार्थी सुरक्षेबाबत उदासीन असल्याचे दिसते. पालकांना विचारणा केली असता मुलाला शाळेतून काढून टाकतील या भितीने ते माहिती देण्यास नकार देतात. एकंदरीत विद्येच्या माहेरघरात विद्यार्थ्यांची सुरक्षाच वाऱ्यावर आहे, असे म्हटले तर वावगे ठरणार नाही.